**प्रकल्प प्रवर्तक मे. टोरन्ट पीएसएच ३, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित साईडोंगर-१-कर्जत उदंचन जलविद्युत प्रकल्प (३,०००.० मेगावॅट) उभारणी करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त –**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. टोरन्ट पीएसएच ३, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित साईडोंगर-१-कर्जत उदंचन जलविद्युत प्रकल्प (३,०००.० मेगावॅट) उभारणी करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी बुधवार, दिनांक ०३ सप्टेंबर, २०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता सर्व्हे क्रमांक २७, गौरमाता मंदिराजवळ, मौजे-गौरकामत, ग्रामपंचायत-वडप, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्रीमती ऋतुजा भालेराव, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ तथा आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी श्री. संदेश शिर्के, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती, श्री संजय भोसले, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती, डॉ. धनंजय जाधव, तहसीलदार, कर्जत तालुका, जिल्हा-रायगड, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी, पोलिस प्रशासन व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड कार्यालय, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांच्यातर्फे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व तदनंतर वेळोवेळी सुधारणा केलेल्या अधिसूचनेनुसार, विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजिका यांनी स्पष्ट केले की, पर्यावरणीय समस्यांवरील सार्वजनिक सुनावणीचे प्राथमिक उद्दिष्ट हे प्रकल्पबाधित क्षेत्रातील रहिवाशांना येणारा प्रकल्प आणि त्याच्या संभाव्य

पर्यावरणविषयक परिणामांबद्दल माहिती देणे, योजलेल्या आवश्यक प्रदूषण नियंत्रण उपायांबद्दल माहिती सामायिक करणे आणि त्यांच्या सूचना आणि अभिप्राय गोळा करणे आहे.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. टोरन्ट पीएसएच३, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांचा त्यांच्या प्रस्तावित साईडोंगर-१-कर्जत उदंचन जलविद्युत प्रकल्प (३,०००.० मेगावॅट) उभारणी करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक ०५.०७.२०२५ रोजीचा अर्ज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित तरतुदींनुसार संवर्ग "अ" अनु.क्रं. १ (सी) - $\geq$ १०० मेगावॅट हायड्रो इलेक्ट्रीक पॉवर जनरेशन प्रकल्प अंतर्गत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (टर्म्स ऑफ रेफ्रेन्स- ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १६.०१.२०२५ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजुरी दिनांक १८.०२.२०२५ रोजी प्रदान केली.

तसेच, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट (NABET) मंजुरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्ती करून पर्यावरण सल्लागार यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण तिन्ही ऋतूंमध्ये म्हणजे पावसाळ्यापूर्व कालावधी – मार्च, २०२५ ते मे, २०२५, पावसाळ्यानंतरचा कालावधी – ऑक्टोबर, २०२४ ते डिसेंबर, २०२४ आणि हिवाळा कालावधी – डिसेंबर, २०२३ ते फेब्रुवारी, २०२४ या कालावधीत पुर्ण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे जनसुनावणीसाठी सादर करण्यात आला.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी दि. १७.०७.२०२५ रोजीच्या पत्राअन्वये उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण

नियंत्रण मंडळ, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ यांना पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ यांनी दि. २१.०७.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे मा. जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांनी त्यांच्या दि. २८.०७.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी बुधवार, दिनांक ०३ सप्टेंबर, २०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता सर्व्हे क्रमांक २७, गौरमाता मंदिराजवळ, मौजे-गौरकामत, ग्रामपंचायत-वडप, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता दिली. तदनंतर, मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्र. ई- ५७/ २०२५, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी-२५०८१२ -एफटीएस-००४८, दिनांक १२.०८.२०२५ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ.क्र. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - अध्यक्ष

**२) प्रादेशिक अधिकारी – रायगड** **- सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई - ४०० ६१४

३) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ -आयोजक

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रे दैनिक कृषिवल आणि दैनिक लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक ०२ ऑगस्ट, २०२५ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज खालील अधिसूचित (notified)/ कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य झोन, न्यु सेक्रेटरीएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१
२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड, अलिबाग,
३) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
४) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड, अलिबाग,
५) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे,
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड,अलिबाग
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, पुणे
८) उप विभागीय अधिकारी, कर्जत, उपविभाग-कर्जत, तालुका-कर्जत, जिल्हा – रायगड,
९) उप विभागीय अधिकारी,खालापूर, तालुका-खालापूर, जिल्हा – रायगड
१०) उप विभागीय अधिकारी,मावळ, तालुका-मावळ, जिल्हा – पुणे
११) मा. पोलिस अधिक्षक, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड
१२) मा.तहसीलदार,तहसील कार्यालय-मावळ, तालुका-मावळ, जिल्हा-पुणे
१३) तहसीलदार, तहसील कार्यालय,कर्जत, तालुका-कर्जत, जिल्हा- रायगड
१४) तहसीलदार, तहसील कार्यालय, तालुका-खालापूर, जिल्हा- रायगड
१५) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,कर्जत, तालुका-कर्जत, जिल्हा- रायगड
१६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,खालापूर, तालुका-खालापूर, जिल्हा- रायगड
१७) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,मावळ, तालुका-मावळ, जिल्हा- पुणे

१८) तालुका-कर्जत:- ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालये-वडप, पोटल, पाली उर्फ कोथल खलाटी, हुमगाव, भिवपूरी, वैजनाथ, मांडवणे, सावळे-हेदवली, सावळे, कशेळे, मोगराज, भालिवडी, कडाव, बोरिवली, पाथ्रज, पिंपळोली, वाकस, नसरापूर, माणगाव, असल, चिंचवली, उकरुळ, उमरोली, वावळोली, किरवळी, हळवली, कर्जत शहर, पळसदरी, वेणगाव, टिवरे, वरई तर्फे नीड, गौरकामत, खांडपे, शिरसे, बीड ब्रु., कोडींवडे

१९) तालुका-खालापूर-ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालये- बीड खुद्र, जाबरुंग

२०) तालुका-मावळ, ग्रामपंचायत कार्यालये-
उधेवाडी, खांडशी, शिरदे, खांड, दाहूली, कांब्रे ना.मा., कुसवली, उकसान, गोवित्री, मालेगाव बु., सावळा

२१) मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

२२) मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

२३) प्रादेशिक अधिकारी,रायगड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४,

२४) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४,

२५) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई – मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांना २५ सूचना/आक्षेप विविध सूचित कार्यालयाकडून/प्रत्यक्ष/पोस्टाने/ ई-मेल द्वारे प्राप्त झालेले आहेत.

आयोजिका यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजिका यांनी प्रतिपादन केले की ही पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिक जनतेने जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजिका यांनी मा. अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सांगितले की ही पर्यावरणविषयक जनसुनावणी ही प्रकल्प प्रवर्तक मे. टॉरेन्ट पीएसएच३ प्रायव्हेट लिमिटेडच्या यांच्या प्रस्तावित साईडोंगर-१-कर्जत उदंचन जलविद्युत प्रकल्प (३,००० मेगावॅट) उभारणीसाठी आयोजित करण्यात आलेली आहे. सदरहू प्रकल्पास भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने प्रकल्प स्थानाच्या १०.० कि.मी. परिघात पर्यावरणीय सर्वेक्षण करण्यास पर्यावरणीय कार्यकक्षा (टीओआर) मंजुरी दिल्यानंतर प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागाराने ते सर्वेक्षण करुन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केला. त्यानंतर प्रकल्प प्रवर्तकांना पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीस मा. जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांनी मान्यता दिल्यानंतर आज ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. ही समिती प्रकल्पास मंजुरी देत नाही, प्रकल्प नाकारत नाही किंवा प्रकल्पाची शिफारसही करत नाही. बैठकीत प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित करण्यात आलेल्या पर्यावरणीय सूचना, हरकती वा आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येतो व सदरहू इतिवृत्त पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण करण्यास सुरुवात केली.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले कि, राज्यातील व देशातील वीजेची वाढती मागणी लक्षात घेऊन प्रकल्प प्रवर्तकांनी प्रस्तावित साईडोंगर-१-कर्जत उदंचन जलविद्युत प्रकल्प (३,००० मेगावॅट) उभारणी करण्याचे योजिलेले आहे. सदरहू प्रकल्पाच्या उभारणसाठी कंपनीने महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागासोबत दिनांक ०३-०९-२०२४ रोजी सामंजस्य करार (MoU) केलेला आहे. प्रकल्पात एक उर्ध्व जलाशय (top reservoir) व खालील बाजूस निम्न जलाशय (bottom reservoir) असणार आहे. सदरहू प्रकल्पात २३ दशलक्ष घन मीटर पाणी दोन्ही जलाशयामध्ये चक्राकार पध्दतीने अविनाशी (non-consumptive) पाणी वापर प्रस्तावित आहे. सदरहू प्रकल्पासाठी २३३ हेक्टर वनजमिन वनविभागाच्या परवानगीने वर्ग करण्यात येईल.

प्रकल्प प्रवर्तक हे प्रस्तावित प्रकल्पा बाबतीतील व त्यातील पर्यावरणविषयक व्यवस्थापन योजनेविषयी माहिती देत असताना काही स्थानिक व्यक्ती या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समितीच्या मंचासमोर येऊन खालीलप्रमाणे एकत्र आक्षेप नोंदवू लागल्या –

**१) श्री सुधाकर घारे, कर्जत राष्ट्रवादी-अजित पवार गट, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगडः-**

सर्व शेतक-यांच्या वतीने मी बाजू मांडत आहे. आम्हांला प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण ऐकायचे नाही. हा प्रकल्प आमच्या कर्जतमध्ये होत आहे, त्याचे आम्ही स्वागत केले असते, मात्र प्रस्तावित प्रकल्प कुठे होणार आहे, शेतक-यांच्या कुठल्या जमिनी अधिग्रहित करण्यात येणार आहेत, त्यांचे गट नंबर/सर्व्हे नंबर, किती शेतकरी बाधित होतील याबाबत काहीही माहिती स्थानिक शेतक-यांना उपलब्ध करण्यात आलेली नाही. त्या शेतक-याचा सर्व्हे नंबर प्रकल्पासाठी अधिसूचित झालेला नाही, नियमांप्रमाणे त्याबाबत राजपत्र (Government Gazette) हे प्रसिध्द करण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे प्रस्तावित प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या वनविभागाची परवानगीसुध्दा नाही. जर जमिन अधिग्रहण करण्यास परवानगी मिळालीच नाही, तर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करणे हे उचित नाही. तरी या जनसुनावणीस आमचा पूर्ण विरोध आहे.

जोपर्यंत प्रकल्प प्रवर्तक शेतक-यांचे कुठले भूखंड अधिग्रहित करणार याची अधिसूचना/गॅझेट प्रकाशित करत नाही, त्याला मोबदला कसा व किती देणार याबाबत पूर्वमाहिती देत नाही,

तोपर्यंत ही जनसुनावणी आमचा पूर्ण विरोधच आहे. त्यांनी उपस्थितांना विचारणा केली असता सर्वांना पाठिंबा व्यक्त केला.

श्री सुधाकर घारे, कर्जत राष्ट्रवादी-अजित पवार गट, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड-यांनी मत मांडताना सांगितले की आम्ही आमचे लेखी आक्षेप सादर केलेले आहेत. आम्ही विकासाच्या विरुध्द नाही. मात्र जर का आमच्या शेतक-यांच्या जमिनी बाजारभावाने घेणार असाल, तर आम्ही प्रकल्पाबाबत सकारात्मक विचाराचा प्रयत्न करु.

त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की सदरहू प्रकल्पास ग्रामपंचायतीकडून पूर्वपरवानगी घेण्यात आलेली नाही. या ग्रामपंचायतीत सरपंच व इतर सदस्य आहेत. मुख्यतः प्रकल्पाचा कुठलाच भाग या ग्रामपंचायतीत येत नाही. तरीही या ग्रामपंचायत हद्दील ही पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी ही आयोजित करण्यात आलेली आहे. तरी आमचा या प्रकल्पास विरोध आहे.

जर प्रकल्पाचा संपूर्ण विषय व कोठे स्थापित होणार, याविषयीच काही माहिती नाही, तर प्रस्तावित प्रकल्पाच्या सादरीकरणाचा आम्हांला काहीही उपयोग नाही. तरी मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी तथा अपर जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की ही जनसुनावणी याक्षणी तहकूब करण्यात यावी.

साईडोंगरला प्रकल्प होणार आहे. तर गौरकामत ग्रामपंचायत क्षेत्रात पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी ही आयोजित केलेली आहे. कुठल्या गावातील किती क्षेत्र प्रकल्पासाठी अधिग्रहित करण्यात येईल, याची माहिती स्थानिकांना नाही. शिवाय प्रस्तावित प्रकल्पास वनखात्याची पुर्वपरवानगी नाही. कुठल्या गट नंबर भूखंडावर प्रकल्प उभारणार याबाबत शासकीय राजपत्र नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना याबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाबाबत असून प्रकल्प नेमका कोठे होत आहे त्याचेच रेखांकित माहिती सादरीकरणात देत आहोत.

त्यावेळी श्री सुधाकर घारे, कर्जत राष्ट्रवादी-अजित पवार गट, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड यांनी आक्षेप नोंदविला की जोपर्यत या प्रकल्पाची संपूर्ण माहिती आमच्या शेतकऱ्यांना होत नाही, कुठल्या गट नंबर, भूखंडावर होणार आहे, त्याची शासकीय अधिसूचना प्रकाशित होत नाही, त्याचा मोबदला किती व त्यास स्थानिक शेतक-यांची सहमती मिळत नाही, तोपर्यत हा प्रकल्प आम्ही होऊच देणार नाही. त्यासाठी ही जनसुनावणी येथेच थांबवावी ही हात जोडून विनंती करत आहे. त्यामुळे ही पर्यावरणविषयक जनसुनावणी ही त्वरित तहकूब करण्यात

यावी. यासाठी काही दिवस घेऊन गावागावातील शेतक-यांना प्रकल्पाबाबत जागृत्ती, भूखंडाचे गट क्रमांक, त्याचा मोबदला याबाबत सर्व माहिती देण्यात यावी. गावात आपले स्वागत करण्यात येईल. मात्र आज जनसुनावणी प्रक्रिया ही थांबविण्यात यावी.

आता मिळालेल्या माहितीनुसार प्रकल्प प्रवर्तक सार्वजनिक रस्ते बंद करणार आहेत. आपला अहवाल आता वाचला. आपण ५५ नंबरचा रस्ता बंद करणार आहेत. तर त्याची सर्व माहिती नियमांप्रमाणे स्थानिकांना मिळालीच पाहिजे. त्यांनी आज जनसुनावणी न होण्याची मागणी केली. त्यांनी उपस्थितांनाही जनसुनावणी न होण्याबाबत प्रश्न विचारला, उपस्थितांनी त्यास पाठिंबा दिला.

प्रकल्प प्रवर्तक यांनी खुलासा करताना सांगितले की जी माहिती पूर्ण उपलब्ध आहे, ती येथे देण्यात येत आहे. भविष्यात लागणा-या गरजांप्रमाणे येथील स्थानिक शेतकरी, स्थानिक लोक, लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याशी सल्लामसलत करुनच, सर्वांनाच विश्वासात घेऊनच पुढील निर्णय घेण्यात येईल. आजचा विषय हा पर्यावरणविषयक, वनविषयक असल्याने त्याबाबत सर्व माहिती उपस्थितांना सांगण्यात येत आहे. प्रस्तावित प्रकल्पाचा आराखडा येथे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. जर उपस्थितांची परत स्लाईड्स बघण्याची माहिती असेल, तर पुन्हा सर्व माहिती देण्यात येईल. तरी कृपया उपस्थितांनी सर्व सादरीकरण ऐकून घ्यावे ही नम्र विनंती.

श्री सुधाकर घारे, कर्जत राष्ट्रवादी-अजित पवार गट, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्प कुठे आहे. कुठल्या ग्रामपंचायत क्षेत्रातील किती जमिन अधिग्रहित करण्यात येईल, स्थानिकांना मोबदला कसा देणार ही माहिती नसताना कसली पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी घेत आहात?

**२) ॲड. योगेश देशमुख**

यावेळी यांनी आक्षेप नोंदविला की या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीबाबत वृत्तपत्रात जनतेच्या माहितीसाठी जी जाहीर सुनावणी प्रकाशित करण्यात आली, त्यात स.न.२७, गाव-गौरकामत, ग्रामपंचायत-गौरकामत येथे पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आयोजित कल्याची माहिती दिलेली आहे. आता स.न.२७ ही कुठुन आला. तो कुठे आहे, तर स.न. २७ हा गौरकामत गावात आहे का याची माहिती प्रथम घेणे अपेक्षित आहे, हे तरी प्रस्तावित प्रकल्पाच्या प्रशासनास माहित आहे काय?

कारण आजची जनसुनावणी ही आपण स.न. २७ हा गौरकामत येथे आहे असे सांगितले तो सर्व्हे नंबर २७ नाही. प्रकल्प प्रवर्तक कदाचित जुना सर्व्हे नंबर सांगत असावेत. ही

जनसुनावणी ही वनविभागाच्या भूखंडावर आयोजित करण्यात आलेली आहे. समोरचा भूखंड हा ग्रामपंचायतीची गुरेचरण्याची राखीव जागा आहे. प्रकल्प प्रवर्तक यांनी ग्रामपंचायतीस प्रकल्प मंजूरीसाठी अर्जसुध्दा केलेला नाही.

तरी प्रथम प्रकल्प प्रवर्तकांनी प्रथम येथील सर्व सत्यपरिस्थिती अवगत करुन घ्यावी व नंतरच परत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी ही आयोजित करण्यात यावी.

श्री घारे यांनी परत आक्षेप नोंदविला की या बैठकीत कर्जत तालुक्याचे तहसीलदार आहेत. त्यांनी कोणतीही मूलभूत माहिती न घेता परवानगी दिली कशी? तहसीलदारसाहेबांनी सर्व ग्रामस्थांची तसेच सर्व पक्षीय स्थानिक नेत्यांची बैठक आयोजित करुन माहिती देणे योग्य होते. सर्व स्थानिक ग्रामपंचायत पदाधिकारी, सर्व पक्षीय स्थानिक नेत्यांची बैठक आयोजित करुन त्यांना प्रथम विश्वासात घेणे गरजेचे होते. असे चुकीचे काम जर तहसीलदार करणार असतील, तर आम्ही सर्वजण तहसील कार्यालयाकडे उपोषणास बसू.

**३) सौ. उषा ढाकोळ, ग्रामपंचायत सदस्या, (माजी उपसरपंच), वडप ग्रामपंचायत, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड:-**

ढाक ग्रामपंचायत क्षेत्रात प्रकल्प होणार आहे. आमच्या तीन पिढ्या येथे राहत आहेत. आता आक्षेप नोंदविल्यांपैकी कोणीही येथे राहत नाही. तर येथील काही उपस्थित कशासाठी आक्षेप नोंदवित आहेत. एखाद्या प्रकल्पामुळे आमच्या ढाक गावाचा विकास होणार असेल, तर त्यासाठी संपूर्ण ढाक गावाची सहमती आहे. आमच्या गावात रस्ता नाही, त्यामुळे किती लोक गाव सोडून दुसरीकडे राहायला गेले, तर यांनी यांच्या मिळकतीतील जागा रस्त्यासाठी का दिली नाही? जो प्रकल्प होणार आहे, त्यास आमची सहमती आहे. प्रकल्पास संपूर्ण वडप ग्रामपंचायतीची सहमती आहे. ज्यांनी प्रकल्पाबाबत आक्षेप, भाषण दिले, त्यांची किती जागा ढाक ग्रामपंचायत क्षेत्रात आहे, हे त्यांनी सांगावे. येथे कुठल्याही पक्षाचे राजकारण आणू नये. ज्यांची जागा नाही, त्यांनी येथे बोलू नये. मंडपात आसनावर बसावे. लोकांमध्ये संभ्रम निर्माण करु नये.

त्यांनी प्रतिपादन केले की ढाक येथे प्रकल्प होत आहे आणि तो आम्हांला हवा आहे. या प्रकल्पामुळे आमचा विकास होणार असेल, तर प्रकल्प आम्हांला मान्य आहे.

त्यावेळी काही स्थानिक एकत्रितपणे आक्षेप नोंदविताना सांगत होते की जर साईडोंगरावर प्रकल्प आहे, तर ही जनसुनावणी १६ कि.मी. लांब असणा-या गौरकामत ग्रामपंचायत क्षेत्रात का आयोजित करण्यात आलेली आहे?

त्यावेळी सौ. उषा ढाकोळ, ग्रामपंचायत सदस्या, (माजी उपसरपंच),वडप ग्रामपंचायत यांनी मत मांडले की आक्षेप नोंदविणा-यांनी त्यांच्या ग्रामपंचायत हद्दीत आम्हांला राहण्यास जागा दिलेली नाही. त्यामुळे त्यांनी प्रकल्पावर आक्षेप घेऊ नये, सर्व वडप ग्रामपंचायतीस प्रस्तावित प्रकल्प हवा आहे. ढाकमध्येच प्रकल्प होणार.

**४) एक उपस्थित**

त्यावेळी एका उपस्थितांनी आक्षेप नोंदविला की प्रस्तावित प्रकल्पामुळे आंबोट, कोथल,पाली, पोटल आणि भालिवाडी ही बाधित होणार आहेत. या गावातील आम्ही शेतकरी आहोत. आमचेही म्हणणे ऐकून घेण्यात यावे. आम्ही सर्व शेतक-यांच्या वतीने सुधाकरभाऊ घारेंना आमची बाजू मांडण्यास सांगितलेले आहे. ते सर्व बाधित शेतक-यांच्या वतीने बोलत आहेत, कुणा गावातर्फे बोलत नाहीत. तसेच प्रकल्प प्रवर्तक हे प्रस्तावित प्रकल्पाच्या स्लाईड्सव्दारे स्थानिकांची दिशाभूल करत आहेत. तरी सदरहू प्रकल्पाची माहिती शासनाव्दारे म्हणजे तहसीलदारांमार्फत सर्व स्थानिक शेतक-यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. शेतक-याला आपले मत व्यक्त करुन द्या. आमच्या पोटची भाकरी जाणार आहे. आमच्या पिढ्यानपिढ्या संवर्धित केलेल्या शेतजमिन बाधित होणार असतील, तर त्यासाठी आम्ही सुधाकरभाऊ घारे यांना आमच्यातर्फे पुढाकार घेण्यास सांगितलेले आहे. आमची त्यास संमती आहे.

**५) श्री दिलिप श्रीखंडे, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष, गाव-पोटल, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड:-**

पोटल, पाली, आंबोट आणी भालिवाडी या ग्रामस्थांच्या वतीने आपणास निवेदन सादर करत आहोत की आम्हांला प्रकल्पास विरोध करायचा नाही. शेतक-यांना न विचारता, कुठलीही परवानगी न घेता जर प्रकल्प असेल, तर गौरकामत गावात ही जनसुनावणी घेण्याचे प्रयोजन काय आहे? प्रकल्पबाधित गावात जनसुनावणी आयोजित करण्यात यावी, आम्ही त्या गावात आमच्या हरकती, आक्षेप उपस्थित करु. येथे जनसुनावणी घेण्यात काहीही अर्थ नाही.

**६) विद्यमान उपसरपंच, पोटल गावातील अंबड गावाचा रहिवाशी**

मी शेतकरी असून या प्रकल्पात माझी जमीन जाणार आहे. माझी प्रशासनास विनंती आहे की आम्ही सर्व स्थानिक शेतकरी येथे आपले सूचना, हरकती, आक्षेप नोंदविण्यास आलेलो आहोत. येथे सर्व सुज्ञ नागरिक उपस्थित आहेत. प्रत्येक शेतक-याला येथे बोलण्याची सुवर्ण संधी मिळणार आहे. तरी एका व्यक्तीचे बोलणे संपल्याशिवाय दुस-या व्यक्तीस प्राधान्य देण्यात येऊ नये. येथे गदारोळ होईल त्यास प्रशासनच जबाबदार राहिल.

तसेच आमच्या येथे प्रकल्पाचे नांव साईडोंगर नंतर प्लस ढाक येते. दहा दिवसांचा गणपती उत्सव असल्याने सर्वच ग्रामस्थ येथे उपस्थित राहूच शकले नाहित. तरी ही जनसुनावणी कोथल तर्फ पाली, पोटल येथेच आयोजित करण्यात यावी. तसेत त्या बैठकीत प्रकल्पास मान्यात द्ययची किंवा नाही द्यायची, तसेच प्रकल्पास सहकार्य करायचे की नाही करायचे हे त्यावेळच्या परिस्थितीवर अवलंबून राहिल.

**७) समुहातील उपस्थित एक व्यक्ती**

यांनी सांगितले की हा प्रकल्प पोटल साईडोंगर येथे प्रस्तावित होत आहे असा उल्लेख आपण केलेला आहे. त्यामुळे दुस-यांनी मान्यता द्यायची की नाही ही प्रश्न येथे येतच नाही. आम्ही घारेसाहेबांना आमच्यावतीने आमची बाजू मांडण्यास सांगितलेले आहे. त्यास माझे समर्थन आहे.

अध्यक्षांच्या आदेशानुसार आयोजक/समन्वयक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी असे स्पष्टीकरण दिले की हा जो साईडोंगर – १ प्रकल्प आहे, त्या प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघात जास्तीतजास्त लोकांना या जनसुनावणीत सहभाग घेता येईल याद्दष्टीने रस्ता जवळ असणे, बैठकीस येण्यासाठी व परत जाण्यासाठी प्रवासी साधने उपलब्ध असणे या सर्वांचा विचार करुनच हे स्थान बैठकीसाठी निवडलेले आहे. तसेच प्रस्तावित प्रकल्पाचे क्षेत्र हे डोंगरावरुन खालपर्यंत आहे. डोंगरावर जाण्यासाठी रस्ता, वाहने नाहित, त्यामुळे हे स्थान बैठकीसाठी नियोजित करण्यात आलेले आहे.

उपस्थितांना आवाहन करण्यात येते की प्रस्तावित प्रकल्पाविषयी फक्त पर्यावरणीय मुद्दे, सूचना, हरकती किंवा आक्षेप नोंदविण्यात यावेत. तसेच लेखी निवदने बैठकीत सादर करण्यात यावीत. बैठकीच्या इतिवृतासोबत ते शासनास सादर करण्यात येतील.

बैठकीच्या सुरवातीस सांगितल्याप्रमाणे तसेच आताच मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितल्यानुसार ही समिती प्रस्तावित प्रकल्पास परवानगी देत नाही, नाकारत नाही किंवा प्रकल्पाचे समर्थन करत नाही. बैठकीच्या इतिवृतांतासोबत सर्व लेखी सूचना/आक्षेप हे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येतील. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेत असते.

## ८) स्थानिक शेतकरी समुह

यावेळेस सदरील समूहाच्या प्रतिनिधीने तहसीलदारसाहेबांना एक पोटल पाली ग्रामपंचायत, भालिवडी व आंबोटच्या वतीने निवेदन सादर केले. आमची मागणी आहे की आम्हांला प्रकल्पास विरोध करायचा नाही. आमच्या ग्रामपंचायती बाजूस ठेऊन आम्हा शेतक-यांना येथे बोलविण्याचा काहीही संबंध नाही. प्रकल्पबाधित पाच गावात जनसुनावणी आयोजित करण्यात यावी, आम्ही आमच्या सूचना किंवा आक्षेप तेथे उपस्थित करु. तसेच श्री सुधाकर घारे हे आमचे नेते असून त्यांना आमचा पाठिंबा आहे.

## ९) आदर्श, पोटल पाली ग्रामपंचायत-

येथे जी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे, ती आम्हांला मान्य नाही. तरी ही बैठक पोटल पाली येथे आयोजित करण्यात यावी.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाचे क्षेत्र हे डोंगरावरुन खालपर्यंत आहे. डोंगरावर जाण्यासाठी रस्ता, वाहने नाहीत, त्यामुळे हे स्थान बैठकीसाठी नियोजित करण्यात आलेले आहे.

## १०) श्री सुधाकर घारे, कर्जत राष्ट्रवादी-अजित पवार गट, तालुका-कर्जत, जिल्हा-

रायगडः-

यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की हा प्रकल्प कुठे सुरु होतो व कोठे संपतो, याबाबतचे प्रथम राजपत्र (गॅझेट) उपलब्ध करुन देण्यात यावे. आमचा विकासाला, प्रकल्पाला विरोध नाही. मात्र प्रकल्पासाठी अधिग्रहित करावे लागणा-या भूखंडाचे सर्व्हे नंबर/गट नंबर, मोबदला याबाबत संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली पाहिजे.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी जनसुनावणी ही वैयक्तिक किंवा परस्पर आयोजित करत नसतो. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार काही अधिसूचित प्रकल्पांना स्थापना करताना किंवा प्रकल्पाचे विस्तारिकरण करताना आगाऊ पर्यावरण अनुमती (Environment Clearance-EC) प्राप्त करणे बंधनकारक आहे. त्यानुसार पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी प्रस्तावित प्रकल्पास (टीओआर-Terms of Reference) मंजूर करुन प्रस्तावित प्रकल्पाच्या स्थानापासून १० कि.मी. परिघातील पर्यावरणीय सर्वेक्षण, पर्यावरणीचा सद्य स्थिती व प्रस्तावित प्रकल्पामुळे परिसरात होणार संभाव्य परिणाम अभ्यासणासाठी आदेश पारित केले. प्रकल्प प्रवर्तक यांना पारित

निर्देशांनुसार नाबेट मान्य पर्यावरण सल्लागार यांच्याकडून तीन महिने सर्वेक्षण केल्यानंतर प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केलेला आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी आगाऊ पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी म.प्र.नि. मंडळास अर्ज सादर केला. जिल्हाधिकारी यांनी मान्यता दिल्यानंतरच ही जनसुनावणी आयोजित करण्यात येते. ही समिती प्रकल्पास मान्यता देत नाही, प्रकल्प नाकारु शकत नाही किंवा प्रकल्पाची शिफारसही करत नाही. बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना,हरकती,आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येतो, तसेच त्यानुसार अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केला जातो. तो केंद्र सरकारला सादर करण्यात येतो. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेते. स्थानिकांच्या, प्रकल्प बाधित ग्रामपंचायत क्षेत्रातील जनतेच्या हरकती नोंदविण्यासाठीच ही जनसुनावणी आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रक्रिया समजून घेण्याची विनंती केली. प्रकल्प सुरु करताना पर्यावरण अनुमती प्राप्त करणे बंधनकारक असून जर पर्यावरण अनुमती मिळाली नाही, तर प्रकल्प सुरुच होणार नाही. प्रकल्पास परवानगी मिळाली तरच पुढे भूसंपादन प्रक्रिया सुरु होतात. याची नोंद सर्व उपस्थितांनी घ्यावी.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले आपण एकाने एकावेळस सूचना, हरकती मांडल्यास त्याची नोंद घेता येईल. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगून फक्त पर्यावरणविषयकच मुद्दा उपस्थित करण्यात याव्यात.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना सादरीकरण पुन्हा करण्याची सूचना केली.

त्यावेळी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना परत सांगितले की या समितीस प्रकल्प मंजूर करण्याचा, प्रकल्पाची शिफारस करण्याचा तसेच प्रकल्प नामंजूर करण्याचा अधिकार नाही. आपण प्रस्तावित प्रकल्पाविषयी या बैठकीत उपस्थित करत असलेल्या सूचना, हरकती, टीकाटिप्पणी वा आक्षेप यांची नोंद घेण्यासाठी आहे. त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करुन प्राप्त झालेल्या लेखी सूचना, अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल केंद्र शासनास सादर करणे हा आहे. तसेच लेखी निवेदनसुध्दा सादर करु शकता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे लेखी निवेदन असल्यास ते सादर करण्याची सूचना केली, त्याची पोच देण्यात येईल. तसेच प्रकल्प प्रवर्तक जे प्रस्तावित प्रकल्पातील पर्यावरणविषयक व्यवस्थापन योजनेविषयी (EMP – Environment Management Plan) जी माहिती सांगितल्यानंतरही प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप हे नोंदवू शकता. अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पाची एकूण माहिती मुद्द्यासकट (overall outline) सांगण्याची सूचना केली.

याठिकाणी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना स्पष्टीकरण दिले की सदरहू प्रस्तावित प्रकल्प हा खाजगी प्रकल्प आहे. त्यामुळे प्रकल्पास पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्याशिवाय परवानगी मिळणार नाही. त्याशिवाय प्रकल्पासाठी भूसंपादन करताच येत नाही.

श्री घारे यांनी माहिती सांगितली की रेल्वेचे राजपत्र तयार झालेले आहे. तहसीलदार यांना ते माहित असेलच. हजार एकर जागेचे राजपत्र तयार करण्यात आलेले आहे. मात्र त्यात अधिग्रहण आहे २००-२५० एकर. या प्रकल्पास भोवतालच्या दहा गावांत जमिन अधिग्रहित करावयाची असल्यास आमचे म्हणणे आहे की प्रथम अधिसूचना प्रकाशित करा, त्यात कुठले गट नंबर/सर्व्हे नंबर अधिग्रहित करणार, किती जमिन घेणार याची माहिती प्रकाशित करा, स्थानिक शेतक-यांशी चर्चा करुन त्यांना विश्वासात घ्या, बाजारभावाने भूखंड विकत घेण्याचा प्रस्ताव ठेवा. मात्र प्रकल्प प्रवर्तक जर दडपशाही व शेतक-यांची दिशाभूल करत असेल, तर येथे ते चालणार नाही. शेतक-यांना बाजारभावाप्रमाणे भाव द्या, येथील शेतकरी हौसेने आपणास त्यांचे भूखंड देतील. शेतकरी पाठिशी राहतील. मात्र प्रकल्पाविषयी काहीही माहिती स्थानिकांना अवगत न करता प्रकल्प लादण्याचा प्रयत्न केल्यास कर्जतकर जनता ते अजिबातच खपून घेणार नाही. तरी येथील स्थानिक शेतकरी, स्थानिक जनतेकडून विनंती करतो की आपण एक महिन्याने परत जनसुनावणी आयोजित करण्यात यावी, आम्ही आपणास मदतच करु. मात्र कुठल्या शेतक-याची किती जमिन जाणार याचे राजपत्र काढण्यात यावे. मगच जनसुनावणी परत आयोजित करा. आता ही प्रक्रिया चुकीच्या पध्दतीने राबविण्यात येत आहे. तसे करु नका. भूखंड अधिग्रहणाची पूर्व सुचना नाही. आम्हांला असे समजले की प्रकल्प अधिका-यांनी ढाक गावात २०-२५ लाख एकरने खरेदी करण्यास सुरवात केलेली आहे. आता त्या शेतक-याला त्या २०-२५ लाखात काय मिळणार? आज मार्केट रेटप्रमाणे पाचपट पैसे त्या शेतक-याला द्यायला पाहिजेत. म्हणजे त्या शेतकज-याला दीड कोटी ते दोन कोटी मिळायला पाहिजे. आता काहीही सुरवात नसताना २०-२५ लाखात कंपनी

भोळया शेतक-यांकडून जमिनी विकत घेत आहेत. माझ्याकडे त्या शेतक-यांचे सातबारा आहेत.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी मत नोंदविले की खाजगी खरेदीस आपण निर्बंध टाकू शकत नाही.

त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना परत सांगितले की ही जनसुनावणी झाली म्हणजे सर्व झाले असे नाही.

श्री घारे यांनी मत मांडले की जनसुनावणी झाली म्हणजे एक पायरी पुढे जाईल. येथील शेतकरी गरीब, भोळा आहे. येथे आदिवासी लोक राहतात, त्यांना कंपनी आमिष दाखवून जमिनी घेत आहे.

**११) एक उपस्थित-**

रेल्वेने जमिन घेतली, तेव्हा त्यांनी पेपरात जाहिरात दिली होती.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की खाजगी कंपनीकडून जमीन खरेदीबाबत शासन लक्ष देऊ शकत नाही, मात्र जर जमिन अधिग्रहण जर शासनाने केले, तर त्याबाबत सर्व प्रक्रिया या पाळल्या जातात. तसेच शासनाकडे भूसंपादनाचा विषय असता तर शासनाचे सर्व निर्देश, भूखंडाचा मोबदला याबाबत पाळले जातात. यावेळी श्री घारे यांनी सांगितले की हीच आमची मागणी आहे की भूसंपादन हे शासनाने करावे. लोकांना पैसे मिळावेत. ते टॅक्स-फ्री असतील. हीच आमची मागणी आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ही पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी असून प्रस्तावित प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरणानंतर सूचना, हरकती नोंदविणे हा आहे.

श्री घारे यांनी प्रस्तावित प्रकल्पास कुठल्याही ग्रामपंचायतीची परवानगी नाही असे सांगितले. त्यावेळी सौ. उषा ढाकोळ, सदस्या, ग्रामपंचायत वडप यांनी सांगितले की ढाक ग्रामपंचायतीने प्रकल्पास जमिनी देण्याचा ठराव मंजूर केलेला आहे.

त्यावेळी आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की सूचना, हरकत नोंदविताना आपले नांव व गावाचे नांव सांगण्यात यावे.

### १२) श्री आत्माराम गायकवाड, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगडः-

माझी पत्नी ग्रामपंचायत सदस्या आहे. आता या ताई म्हणाल्या वडप ग्रामपंचायतीची परवानगी आहे. तर ग्रामसभेच्या ठरावासाठी विशेष ग्रामपंचायत सभा आयोजित करणे आवश्यक आहे. तर हा विषय तहकूब ग्रामसभेत झालेला आहे. सभेच्या एजन्डावर हा विषय नव्हता. तहकूब ग्रामसभेत हा विषय झालेला आहे. त्यामुळे हा ठराव बेकायदेशीर आहे.

त्यावेळी श्री घारे यांनी बेकायदेशीर ठरावाबाबत दाद मागण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करत असल्याचे सांगितले.

येथे सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की या बैठकीत ग्रामसभेचा ठराव बेकायदेशीर आहे हा विषय नाही. ज्यांना पुढील प्रक्रियेसाठी जायचे ते जाऊ शकतात. ही बैठक येथे प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, हरकती, आक्षेप नोंदविण्यासाठी आहे. आपण उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे शासनास सादर करणे हाच या समितीचा मूळ उद्देश आहे. येथे प्रकल्पाबाबत कुठलाच निर्णय घेतला जात नाही. तरी शांततेने पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदविण्यात यावेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की शांततेने पर्यावरणीय सूचना, आक्षेप हे नोंदविण्यात यावेत. त्याशिवाय काही लेखी सूचना, आक्षेप असल्यास त्या सादर करण्यात याव्यात.

### १३) श्री सुनील कुंभार, राहणार-पाली, जिल्हा-रायगडः-

मी साईडोंगर पालीचा रहिवाशी आहे. ही पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आहे. हा प्रस्तावित प्रकल्प ज्या क्षेत्रात स्थापित होणार आहे, ते पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र (ESZ – Eco-Sensitive Zone) म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. तर हा प्रकल्प तेथे कसा स्थापित करणार आहेत?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ज्या केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाने मान्यात दिली, त्या विभागास हा अहवाल बैठकीच्या इतिवृतासोबत सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे केंद्र शासनाचा पर्यावरण विभागच याबाबत निर्णय घेईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की अशा सूचना, हरकतींची नोंद घेण्यासाठीच ही जनसुनावणी आहे.

**१४) श्री निलेश भगवान म्हसणे, कर्जत तालुका चिटणिस,भाजपः-**

येथे उपस्थित असलेल्या स्थानिकांनी वस्तूस्थिती मांडलेली आहे. आज पोटल, आंबोट पाली या गावातील शेतकरी अनभिज्ञ आहे. जरी प्रकल्पाचे स्वागत करत असलो, तरी कोणाच्या कुठल्या जमिनी म्हणजे गट नंबर/सर्व्हे नंबर अधिग्रहित करण्यात येणार आहेत, ते शेतक-यांना, स्थानिकांना माहितच नाही. तर येथे सुधाकरभाऊ घारे जे म्हणाले त्याप्रमाणे प्रकल्पासाठी तरी कोणाच्या कुठल्या जमिनी म्हणजे गट नंबर/सर्व्हे नंबर अधिग्रहित करण्यात येणार यासाठी राजपत्र त्वरित प्रकाशित करण्यात यावे. तसेच शेतक-यांना शासकीय निर्देशांप्रमाणेच भाव देण्यात यावा. तो बाजारभावापेक्षा जास्त पाचपट किंवा त्याहून जास्त असतो.

प्रकल्प प्रवर्तकांनी या प्रकल्पासाठी ग्रामपंचायतींनासुध्दा विश्वासात घेतलेले नाही. माझी पत्नी ग्रामपंचायत सदस्य आहे. त्यांनाही विचारात घेतलेले नाही. शेतक-यांना अंधारात ठेऊन या प्रकल्पाचे काम चालू आहे. तर आंबोट, पोटल, पाली या गावांतर्फे माझा या प्रकल्पास पूर्णपणे विरोध आहे.

**१५) श्री पंकज जाधव, शिवसेना पक्ष, गौरकामत गाव, तालुका-कर्जत,जिल्हा-रायगडः-**

येथे काही स्थानिकांनी, लोकप्रतिनिधींनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी गैरसमज करुन घेतलेले आहेत. शेतक-यांना त्यांच्या मागणीनुसार जमिन अधिग्रहणाचा भाव हा मिळालाच पाहिजे. त्याहीपेक्षा ज्याची जमीन प्रकल्प अधिग्रहित करणार आहे, त्या शेतक-याच्या कुटुंबातील एका व्यक्तीस प्रकल्पात रोजगाराची संधी ही मिळालीच पाहिजे. ८०% समाजकारण व २०% राजकारण करणारा शिवसैनिक असतो.

**१६) ॲड. गोपाळ शेळके,राहणार-कर्जत,जिल्हा-रायगडः-**

या भूसंपादन विषयात मी सगळे पाहिलेले आहे. जनलढे केलेले आहेत. शेतक-यांना त्यांच्या मनासारखा भाव मिळाल्यानंतर शेतकरी सहकार्य करतात. प्रथम चार नंबर नोटिसा जमिन मालकास पाठवितात. भूसंपादन कायदा, २०१३ प्रमाणे पाचपट जमिन अधिग्रहण मोबदला दिला पाहिजे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना परत सांगितले की या बैठकीत जमीन अधिग्रहणाचा विषय नाही. येथे फक्त प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आहे. येथे प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप उपस्थित करण्यात याव्यात. याशिवाय जनसुनावणी झाली म्हणजे सर्वकाही

झाले असे नाही. प्रकल्पाबाबत सर्व निर्णय हा केंद्र सरकारकडून घेतला जातो. तरी उपस्थितांनी प्रथम आपले नाव, गावाचे नाव सांगावे व पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप उपस्थित करण्यात यावेत. त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल व केंद्र सरकारला सादर करण्यात येईल.

**१७) ॲड. ऋषिकेश जोशी, कर्जत, जिल्हा-रायगड, राज्यस्तरीय सभासद, भाजप कार्यकर्ता** :-

या प्रकल्पास परवानगी देण्यात आलेली आहे. त्याबाबत निधीची तरतुद झालेली असेल.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की सदरहू प्रकल्पास मान्यता देण्यात आलेली नाही. प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना, २००६ नुसार पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत टीओआर प्राप्त करण्यासाठी अर्ज केला. त्यास मान्यता मिळाल्यानंतर प्रकल्प प्रवर्तकांना नाबेट प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार संस्थेकडून प्रकल्प स्थानापासून १० कि.मी. परिघातील पर्यावरणीय सद्यस्थिती व प्रस्तावित प्रकल्पामुळे भविष्यात होणारे संभाव्य आघात याबाबत सर्वेक्षण व अभ्यास करुन प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज सादर केला. जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. या समितीस प्रकल्पास मान्यता देण्याचा, प्रकल्प नाकारण्याचा, प्रकल्पाची शिफारस करण्याचा अधिकारी नाही. उपस्थितांनी उपस्थित केलेल्या पर्यावरणीय सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त केंद्र सरकारला सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती पुढील निर्णय घेते. केंद्र सरकारने पर्यावरण अनुमती (ईसी) मंजूर केल्यानंतरच प्रकल्पाचा डीपीआर तयार होतो व नंतरच भूसंपादन/जमिन अधिग्रहणाबाबत पुढील निर्णय घेण्यात येतात.

श्री जोशी यांनी विचारणा करताना सांगितले की जर अजूनही परवानगी दिलेली नाही तर त्याठिकाणी झाडे कापल्यानंतर ठेवण्यासाठी गोडाऊनची व्यवस्था का करण्यात येत आहे? लाकूडसाठा करण्यासाठी आतापासून जमीनीची पाहणी सुरु करण्यात आलेली आहे. ही पूर्णपणे शेतक-यांची फसवणूक आहे.

प्रकल्पाचा कार्यकारी सारांश अहवाल मी वाचला आहे. त्यात नमुद केलेले आहे की प्रस्तावित प्रकल्प हा "पश्चिम घाट पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रात" (Western Ghats Eco-

Sensitive Area) येतो. त्यातील २३३ हेक्टर वनजमिनीचा समावेश आहे. जेथे केवळ झुडुपे, गवत, आणि प्रबळ समुदाय प्रमुख आहे.

जर तेथे फक्त झुडुपे आहेत, मग तेथील झाडे कोठे आहेत? हा प्रकल्प अहवाल पुर्णपणे बनावट (forgery) आहे. ही पूर्णपणे खोटी माहिती असून ज्यांनी हा बनावट अहवाल केला, त्याच्याविरुध्द मी एफ.आय.आर. (F.I.R.) करत आहे. कारण येथे झाडे नाहित अशी अहवालात नोंद आहे, झुडुपे व गवत आहे अशी नोंद आहे.

हा प्रकल्प घनदाट वन (Heavy Density Forest) क्षेत्रात स्थापित करण्यात येणार आहे. महाराष्ट्राचा राज्य प्राणी "शेकरू" याचा येथे वावर आहे. तो फक्त भारतात नाही तर जगात नामशेष (extinct) झालेला प्राणी आहे. अत्यंत दुर्मिळ झालेला प्राणी आहे. भीमाशंकर अभयारण्य फक्त दहा-पंधरा कि.मी. अंतरावर आहे. या कर्जतच्या जंगलातून पट्टेरी वाघ नामशेष झालेला आहे.

भारताच्या घटनेनुसार महाराष्ट्रात २७% वन असणे अनिवार्य आहे. महाराष्ट्र राज्यात वनक्षेत्र २१% झालेले आहे. आणि येथे प्रकल्पासाठी २३३.० हेक्टर दाटवन क्षेत्रात वृक्षांची कत्तल करणार आहे. जर महाराष्ट्र शासन वनक्षेत्राचे प्रमाण वाढविण्याचा प्रयत्न करत आहे, तर २३३ हेक्टर दाटवन क्षेत्रात वृक्षतोड करुन झाडे कधि मोठी होणार. लोकांनी प्राणवायू कसा घ्यायचा?

त्याचप्रमाणे वनक्षेत्रात जाणारा, राहणारा जो आदिवासी आहे, त्याचे उपजिविकेचे (livelihood) साधन नष्ट होणार आहे. मात्र अहवालात अशी नोंद केलेली आहे की प्रस्तावित प्रकल्पाच्या वनक्षेत्रात भारतीय सी.आर, भारतीय कोल्हा, भारतीय लांडगा, जंगली मांजर, बिबट्या, भारतीय साळिंदर, अस्वल, बोनेट माकड, राखी लंगूर, खारुताई, चौशिंगी हरण, सांबार, भारतीय खवले मांजर या प्राण्यांचा या वन्य क्षेत्रात समावेश आहे.

आपल्या अहवालाप्रमाणे वरिल प्राणी येथे आहेत, जे दाट वन क्षेत्रातच राहतात. मात्र अहवालात नमुद आहे की येथे झुडुपे व गवत आहे. तसेच या प्राण्यांच्या यादीत शेकरु प्राण्यांचा उल्लेख टाळला आहे. माझ्या माहितीप्रमाणे येते पक्ष्यांच्या ४०० च्या वर प्रजाती आहे. येथे पन्नास प्रकारचे विविध सापांचे अस्तित्व आहे. तहसील कार्यालय पुर्वी जेथे होते, तेथेच पंचवीस प्रकारचे साप आढळून येतात. याचा उल्लेख अहवालात नाही. येथे खोट्या प्रकारचे अहवाल तयार करुन राजकारण करत आहेत.

प्रकल्प प्रवर्तक प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात जंगलतोड करणार आहेत, तर त्याची बदली भरपाई (compensation replacement) कशाप्रकारे करण्यात येईल? याबाबत

स्पष्टीकरण या अहवालात दिलेले नाही. हा प्रकल्प वनक्षेत्राची, कर्जतमधील गोरगरिबांचा हानी करणारा प्रकल्प आहे.

येथे १५० वर्षांपूर्वी असाच प्रकल्प टाटा कंपनीने बांधला. त्याचे पाणी पाटबंधारे खात्यामार्फत शेतक-यांना मिळते. टाटाच्या प्रकल्पातून जी वीज निर्माण होते, ती कर्जतकरांना कधीही मिळालेली नाही.

प्रस्तावित टोरंट प्रकल्प आम्ही कर्जतकर होऊ देणार नाही. मात्र झालाच, तर कर्जतकरांना ती वीज मिळणार का? शिवाय त्या वीजेवर व पाण्यावर आमचा मोफत मिळण्याचा अधिकार आहे.

मात्र कुठल्याही परिस्थितीत येथील वनसंपत्तीचे, तेथील प्राण्यांचे, तेथील आदिवासी समाजाचे या प्रकल्पामुळे हानी होणार असेल, तसेच गरिब शेतक-यांची फसवणूक करुन जमिनीचे अधिग्रहण झालेले असेल, प्रथम ज्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केला, त्याच्याविरुध्द गुन्हा नोंदविण्याची मी मागणी करत आहे.

पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष हे कार्यकारी दंडाधिकारी आहेत, तर येथील नागरिकांना फिर्याद लावण्याची वेळ आणू नका, त्यांनी सु-मोटो कारवाई करावी. तसेच पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीबाबत जाहीर सूचना कोणकोणत्या वृत्तपत्रात प्रकाशित केलेली होती? कारण मलाही दोन तासांपूर्वी आज पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीबाबत माहिती मिळाली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांना वृत्तपत्रात जाहीर सूचनेबाबत माहिती अवगत करण्याची सूचना केली.

आयोजिका/समन्वयक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार एका स्थानिक वृत्तपत्रात त्या राज्याच्या स्थानिक/राज्य भाषेत (महाराष्ट्रात मराठीत) व एक राष्ट्रीय भाषेत इंग्रजीत जनसुनावणीच्या तीस दिवस अगोदर जनतेच्या माहितीसाठी जाहीर सूचना प्रकाशित करणे बंधनकारक आहे. मात्र उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, नवी मुंबई यांनी दोन स्थानिक वृत्तपत्रात म्हणजे दैनिक कृषिवल व दैनिक लोकमत यात मराठीत व एक राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक ०२-०८-२०२५ रोजी पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीची सूचना प्रकाशित केलेली होती.

त्याचप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रस्तावित प्रकल्पाचा कार्यकारी सारांश (Executive Summary) हा काही अधिसूचित शासकीय कार्यालये व प्रकल्पबाधित ग्रामपंचायत कार्यालये तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर (website) मराठी व इंग्रजीत जनतेच्या माहिती व अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेला होता.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्प आपण prime facie-प्रमुख चेहरा म्हणून ऐकायचा असतो.

श्री जोशी यांनी आक्षेप नोंदविला की जर प्रकल्पास मान्यता नाही, तर मोठ्या प्रमाणात जड मशिनरी तिथे नेलेल्या आहेत. तर स्थानिक शेतक-यांना आवाहन आहे की त्यांनी फोटो काढावेत. ते फोटो आपण प्रसिध्द करु व या कंपनीच्याविरुध्द मोठे जनआंदोलन उभे करु. त्यावेळी शेतक-यांनी सांगितले की मशिनरी डोंगरावर नेलेल्या आहेत.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपल्या सर्व हरकती नोंदवा. त्याची इतिवृत्तात नोंद घेण्यात येऊन बैठकीच्या इतिवृतात त्याचा समावेश करण्यात येईल व पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येतील. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेईल. तरी आपण आपले आक्षेप नोंदवावेत.

श्री जोशी यांनी आक्षेप नोंदविताना सांगतिले की जर प्रकल्पास पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त नाही, तर त्याच्या अगोदरच वनेतर जमिनीवर लागवड करण्यासाठी शाश्वत प्रमाणपत्र (Sustainable Certificate) प्रस्तावित करण्याचे विभागीय वन अधिकारी, वनविभागाने सर्टिफिकेट कसे प्रदान केले? यावरुन माझी हरकत आहे की सदरहू प्रकल्प हा अधिसुचित विभागाकडून अगोदरच मंजूर करुन घेतलेला आहे व जनतेची दिशाभूल करण्यासाठी हे जनसुनावणीचे नाटक करत आहात.

त्यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी विनंती केली की आपण कार्यकारी दंडाधिकारी असल्याने आपण प्रकल्पाविरुध्द एफ.आय.आर. करु शकता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक आक्षेप बैठकीत घेता येतील. मात्र वनेतर जमिनीवर वृक्षलागवड हा मुद्दा वनविभागाच्या कक्षेत येत आहे. तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, २००६ च्या अधिसूचनेनुसार वैयक्तिक एफ.आय.आर. जारी करणे अपेक्षित नाही.

याबाबत आपण कायद्याचे अवलोकन करावे. मात्र याबाबत आपण individual notice ची provision दाखवावी.

त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्पास पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी ToR (Terms of Reference) संमत/प्रदान केला. त्यानंतरच प्रकल्पांनी सर्व निर्देश पाळून पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केलेला आहे. त्यानंतर प्रकल्प प्रवर्तकांनी म.प्र.नि.मंडळास पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज सादर केला. जिल्हाधिकारी यांनी फक्त पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्याची परवानगी दिलेली आहे. ती प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती ही गठित केलेली आहे. पर्यावरण बैठकीत स्थानिकांनी उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप नोंदविण्याचे काम फक्त ही समिती करत असते. बैठकीचे इतिवृत्तात त्यांचा समावेश करण्यात येतो. नंतर ते केंद्र सरकारला सादर केले जाते.

श्री जोशी यांनी आक्षेप नोंदविला की १३,००० कोटींचा प्रकल्प असून तीन पेपर्समध्येच जाहीर जनसुनावणीची जाहिरात देण्यात येते,ज्याचा या परिसरात विशेष खप नाही. Doctrine of Notice या तत्वाचा भंग करण्यात आलेला आहे.

श्री जोशी यांनी आक्षेप नोंदविला की जर वनविभागाची २३३ हेक्टर जागा प्रकल्पासाठी जाणार असेल, तर वनविभागाचे सक्षम अधिकारी यांना बैठकीस का बोलाविले नाही? तसेच येथे दाट जंगल आहे की दिवसासुध्दा सुर्यप्रकाश पोचत नाही, तेथे अहवालात गवत व झुडुपे लिहिलेली आहे.

येथे Doctrine of Notice या तत्वानुसार शेतक-यांनी या बैठकीची आगाऊ सूचना देणे आवश्यक होते. तरी आपण ही जनसुनावणी तहकूब करून जनसुनावणी परत आयोजित करण्यात यावी. आम्ही मोठ्या प्रमाणात बैठकीत उपस्थित राहून सूचना, आक्षेप नोंदवू.

आयोजिका यांनी परत सांगितले वृतपत्रात पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीबाबत प्रसिध्दी दिल्याबरोबरच प्रकल्पबाधित ४८ ग्रामपंचायत कार्यालयात, जिल्हा परिषद, उप विभागीय कार्यालये, तसेच जिल्हाधिकारी कार्यालच, तसेच म.प्र.नि. मंडळाच्या वेबसाईटवर प्रस्तावित प्रकल्पाचा कार्यकारी सारांश अहवाल जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेला होता.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार एका स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत म्हणजे मराठीत व एक राष्ट्रीय वृत्तपत्र त्यात इंग्रजीत बैठकीच्या तीस दिवस अगोदर पर्यावरणविषयक जाहीर सूचना प्रकाशित करणे बंधनककारक आहे. येथे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने एक ऐवजी दोन स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरणविषयक जाहीर सूचना प्रकाशित केलेली आहे. या जनसुनावणीचा उद्देश स्थानिकांकडून प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, आक्षेप उपस्थित करण्यात यावेत, त्याची इतिवृत्तात नोंद घेण्यात येऊन ते इतिवृत्त केंद्र शासनास सादर करण्यात येते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती, यांनी श्री जोशी यांना अध्यक्षांना वैयक्तिक नोटीस देण्याची सूचना केली.

त्यावेळी आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी श्री जोशी यांना त्यांच्या सूचना, आक्षेप वैयक्तिकरित्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास, तसेच पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयास सादर करण्याची सूचना केली.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी येथे स्पष्टीकरण दिले की केद्र सरकारने टीओआर प्रदान केल्यानंतर कंपनीला नाबेटने मंजूर केलेल्या पर्यावरण सल्लागारांकडून पर्यावरण सर्वेक्षण करणे बंधनकारक आहे. त्याची माहिती जनसुनावणी समितीला नसते. या समितीचे काम आपण उपस्थित केलेल्या सूचना, हरकती नोंदविणे व त्याचा इतिवृतात समावेश करुन केंद्र शासनास सादर करणे हा आहे. पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी झाली, म्हणजे प्रकल्पास मंजुरी मिळाली असे नाही.

**१८) श्री अमित मराठे, राहणार-जांबिवली, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगडः-**

आजची जनसुनावणी ही पर्यावरणविषयक आहे. तर मला कंपनीस दोन मुद्दे विचारायचे आहेत. त्यातील पहिला प्रश्न बुडित क्षेत्र व बाधित क्षेत्र या दोन्हीविषयी माहिती द्यावी.

त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की आपण आपल्या हरकती, आक्षेप नोंदवावेत, त्याची नोंद घेण्यात येत आहे.

श्री मराठे यांनी सूचना केली की प्रथम बुडित क्षेत्र व बाधित क्षेत्र याबाबतची माहिती देण्यात यावी.

त्यांनी पुढे सांगितले की माधवराव गाडगीळ यांचा अहवालानुसार पश्चिम घाट संवेदनशील क्षेत्राबाबत पर्यावरणविषयक समिती अवगत असले. त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पश्चिम घाट संवेदनशील

क्षेत्र अधिसूचना हा ज्या पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी तयार केलेला आहे, त्या पर्यावरण विभागासच या बैठकीचे इतिवृत्त सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे आपण आपल्या सूचना, हरकती उपस्थित कराव्यात.

श्री मराठे यांनी सूचना करताना सांगितले की बैठकीत ॲड. जोशी यांनी उपस्थित केल्यानुसार पश्चिम घाटात दाट जंगल, दुर्मिळ वनस्पती प्रजाती, दुर्मिळ प्राणी आहेत. आता गिधाड असा पक्षी आहे की जो नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. तसेच बैठकीत ॲड. जोशी यांनी सूचविल्याप्रमाणे कंपनी प्रशासनाने स्थानिक गावक-यांसोबत जंगलात जावे. येथे देवराई, आमराई असे प्रकार आहेत आजही २०२५ साली सूर्यप्रकाश जमिनीवर दाट झाडींमुळे येत नाही. कंपनीच्या अहवालात सांगतात की येथे दाट जंगलच नाही.

शासन दरवेळी वृक्षारोपण करण्यास प्रोत्साहन देते. येथे २३३ हेक्टर वनजमिनीवर प्रकल्प होणार आहे. पूर्वी दाभोळ पॉवर, पुर्वीचे एन्रॉन, त्यांचा प्रकल्प होता ७५० मेगावॅट. येथे कंपनीचा ३,००० मेगावॅटचा प्रस्तावित प्रकल्प आहे. एवढा ३,००० मेगावॅटचा प्रस्तावित प्रकल्प उभारणी करताना कंपनीने अहवालात कुठेही बुडीत क्षेत्र व बाधित क्षेत्र याची सखोल माहिती दिलेली नाही. शेतक-यांना माहित नाही की आपले क्षेत्र हे बुडित क्षेत्रात वा बाधित क्षेत्रात आहे.

त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण उपस्थित करत असलेल्या सूचना, हरकती यांची नोंद घेण्यात येत आहे. तरी आपण आपल्या सूचना, हरकती उपस्थित कराव्यात.

श्री मराठे यांनी सूचित केले की या बैठकीत ॲड. जोशी यांनी जे मुद्दे उपस्थित केले, त्यावर आपणाकडून एक कोअर समिती गठित करण्यात यावी. प्रकल्प प्रवर्तकांनी उपलब्ध अहवालाचे ती कोअर समिती क्रॉस चेकिंग करेल. कारण प्रकल्प प्रवर्तकांनी किंवा त्यांच्या पर्यावरण सल्लागार यांनी सादर केलेला अहवाल हा पूर्णपणे चुकीचा आहे. ॲड. जोशी यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांनुसार येथे वनखात्याचे अधिकारी येथे उपस्थित असणे आवश्यक होते. तसेच अहवालात सांगण्यात आलेले आहे की फक्त १६ कि.मी. अंतरावर भीमा-शंकर अभयारण्य आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी परत सांगितले की आपण फक्त मुद्दे मांडा, त्याची अहवालात नोंद घेण्यात येत आहे. भारत सरकारच्या पर्यावरण, वने विभागातच हा अहवाल सादर करण्यात येणार आहे. तेथे वनक्षेत्रातील तज्ज्ञ, अभ्यासक असतात. तरी आपण फक्त पर्यावरणीय मुद्दे उपस्थित करावेत.

श्री मराठे यांनी सांगितले की प्रकल्पापासून फक्त १६ कि.मी. अंतरावर भीमा-शंकर अभयारण्य आहे. वन्यजीवांना कुठेही सीमा मर्यादा (boundary limit) नसतात. ते १६.० कि.मी.च्या परिसरात फिरतात, तसेच १६०.० कि.मी.च्या परिसरात फिरतात. येथे दाट जंगल आहे. त्याबाबत सर्वेक्षण झालेलेच नाही. या प्रकल्पामुळे पर्यावरणाची हानी होणार आहे.

**१९) श्री रघुनाथ गणपत विभा, पाली तर्फे कोथल खलाटी, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड:-**

वनविभागाला लागूनच आमचे गाव आहे. जर या प्रकल्पाच्या अहवालात बरेच वन्यप्राणी दर्शविलेले नाही, तरी पाली तर्फे कोथल गावात जंगली डुक्कर यास आपण रानडुक्कर म्हणतो, यांचा आमच्या गावात हैदोस आहे. मी आमच्या फार्म हाऊसमध्येच राहतो. आणि आमच्या व परिसरातील गावांतील शेतीचे नुकसान या रानडुक्करांमुळे होत आहे. माझे एवढेच सांगणे आहे की प्रकल्प होईल वा होणार नाही, मात्र वन्यप्राण्यांची काय व्यवस्था केलेली आहे किंवा काही तरतुद केलेली आहे काय याची माहिती जनसुनावणीत मिळावी.

**२०) श्री केतन बेलोसे,**

आम्ही सर्व ग्रामस्थांनी आपणास निवेदन दिलेले आहे की या प्रकल्पात जी गावे बाधित होत आहेत, त्यात पाली तर्फे कोथल खलाटी, मौजे पोटल, आंबोट, साईडोंगर, भालिवाडी व ढाक ही आहेत. आता जनसुनावणी ही मौजे गौरकामत येथे आयोजित करण्यात आलेली आहे. भूसंपादनामध्ये कुठेही गौरकामतचा उल्लेख नाही. तरी आम्ही निवेदन दिलेले आहे की ही जनसुनावणी तात्काळ तहकूब करण्यात यावी व ही जनसुनावणी प्रकल्पबाधित गावातच घेण्यात यावी. याचे उत्तर त्वरित देण्याची आम्ही विनंती केलेली आहे. तरी उत्तर देण्यात यावे. काही व्यक्तींनी सामुहिकपणे जनसुनावणी रद्द करण्याची मागणी केली.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उत्तर दिले की प्रस्तावित प्रकल्पामुळे बाधित गावांची यादी प्रकल्प प्रवर्तकांकडून म.प्र.नि. मंडळास प्राप्त झालेली होती. त्यात गौरकामत गावाचा उल्लेख होता. त्यानुसार येथे गौरकामत गावात ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे.

**२१) श्री कृष्णा जोशी, विद्यमान उपसरपंच, पोटल गाव, तालुका-कर्जत,जिल्हा-रायगड:-**

आजची जनसुनावणी ही पर्यावरणविषयक जनसुनावणी म्हणून आयोजित करण्यात आलेली आहे. हा टोरेंट कंपनीचा प्रकल्प साईडोंगर येथे आयोजित असून मौजे पाली तर्फे

कोथल खलाटी, पोटल, साईडोंगर, आंबोट, ढाक, भालिवडी ही गावे बाधित होणार आहेत. या प्रकल्पाचा उल्लेख प्रथम साईडोंगर नंतर ढाक असा केला जातो. साईडोंगर पासून गौरकामत गावात ही जनसुनावणीस येण्यासाठी कंपनीने कुठल्याही वाहनांची व्यवस्था केलेली नाही. दहा दिवसांचा गणपती उत्सवामुळे घरात धार्मिक कार्ये असल्याने बरेच लोक येथे येऊ शकलेले नाहीत.

तरी मौजे पाली तर्फे कोथल खलाटी, पोटल ग्रामपंचायतीतर्फे आपणास विनंती आहे की ही जनसुनावणी तहकूब करुन पालीतर्फे कोथल खलाटी येथे घेण्यात यावी. त्यामुळे स्थानिक शेतक-यांनी त्यांच्या मागण्या मांडता येतील. याठिकाणी मी या जनसुनावणीत जाहीर निषेध करतो. तरी पुढील पाच मिनिटात येथील शेतकरी व स्थानिक ही जनसुनावणी सोडून बाहेर जातील आणि आताच पुढच्या जनसुनावणीची तारीख घोषित करण्यात यावी.

त्यावेळी बरेच उपस्थित एकत्रितपणे जनसुनावणी रद्द करण्याची मागणी करत होते.

**२२) सौ. उषा ढाकोळ, ग्रामपंचायत सदस्या, (माजी उपसरपंच), वडप ग्रामपंचायत, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगडः-**

जनसुनावणी रद्द करण्याची मागणी करण्यात येत आहे. मात्र ढाक गावातूनच पाणी अडवले जाणार आहे. त्यामुळे आम्हांला या प्रकल्पाची गरज आहे, म्हणून ही पर्यावरणविषयक जनसुनावणी ही चालू ठेवण्यात यावी.

**२३) ॲड. संकेत भासे, राहणार-कर्जत,तालुका-कर्जत, जिल्हा-रायगडः-**

मी भालिवडी गावाचा रहिवाशी असून कर्जतचा नागरिक आहे. ही पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आयोजित केलेली आहे, त्याचा मुळ उद्देश लोकांच्या भावना जाणून घेणे. प्रस्तावित टोरंट प्रकल्प कर्जत तालुक्यात उभारणीच्या प्रस्तावास आम्ही निश्चितच सहकार्य करु.

काही लोकांचे म्हणणे आहे की गणपती उत्सवामुळे येता आले नाही, काही लोकांचे म्हणणे आहे की बैठकीची बातमीच मिळाली नाही. अशा बाबतीत आपण लोकांना मार्गदर्शन करावे. प्रत्येकजण आपापल्या पध्दतीने विचार मांडत आहे. वनक्षेत्रातील २३३ हेक्टर जमिन आपण प्रकल्पासाठी वळती करत आहात. टाटा सारखा टोरन्ट चा प्रकल्प कर्जत तालुक्यात होत असेल, तर त्याचे स्वागत आहे, मात्र येथील स्थानिक शेतकरी, स्थानक लोक, येथील सर्व ग्रामपंचायती, सर्व लोकप्रतिनिधी या सर्वांनाच आपण विचारात घेतले पाहिजे.

भीमा-शंकरसारखे अभयारण्य जवळ आहे. य़ेथेही वनक्षेत्र आहे. प्रकल्पासाठी झाडे कापावी लागणार, तर त्या प्रत्येक झाडाचे पुनर्रोपण कुठे करणार आहेत हा प्रश्न सर्व कर्जतकरांना

पडलेला आहे. या प्रकल्पाचे आरेखन आम्ही आता बघितले, त्या अगोदर आम्ही बघितलाच नव्हता. आमचे प्रकल्पास सहकार्य करेल, मात्र स्थानिकांनी केलेल्या सर्व मागण्यांचा विचार करण्यात यावा. स्थानिकांना विश्वासात घेण्यात यावे.

यावेळी काही उपस्थित जनसुनावणी रद्द करण्याच्या घोषणा देत होते.

## २४) श्री किरण खंडू ठाकरे, भाजप कर्जत विधानसभा प्रमुखः-

या बैठकीची माहिती फक्त ३-४ तास अगोदर कळली. एका विभागातील शेतकरी एक बोलत आहेत, तर दुस-या विभागातील शेतकरी हे वेगळे बोलत आहेत. मात्र आम्ही शेतक-यांना न्याय देण्यासाठीच आलेले आहोत. मात्र पिढ्यानपिढ्या जपलेली, कसलेले शेतक-यांची जमिन आहे. ती प्रकल्पास दिल्यानंतर शेतकरी भूमीहिन होणार आहेत. कारण कंपनीने दिलेल्या भावात त्यांना दुसरीकडे जमिन घेणे शक्य होणार नाही.

ही कंपनी त्यांचे काम करण्यास आलेली आहे. आपण एकत्र राहिलो नाही, तर गोरगरिब शेतक-यांचे नुकसान होईल. आपण येथे शेतक-यांना, समाजातील गोर-गरिब घटकांना न्याय देण्यासाठी एकत्र आलेलो आहोत. मी येथील सर्व समाजघटकांना आवाहन करतो की एकीने आपण या प्रकल्पाच्याविरुध्द उभे राहून न्याय मिळवू.

श्री किरण खंडू ठाकरे यांनी प्रतिपादन केले की आज गणपती उत्सव चालू आहे. तसेच प्रकल्प प्रवर्तक यांनी कुठल्या जमीनी अधिग्रहित करण्यात येतील याची काहीही माहिती बैठकीत दिलेली नाही. त्यामुळे येथील स्थानिक अनभिज्ञ आहेत. काही लोकांचे मत आहे की जनसुनावणी चालू ठेवावी, तर काहींचे म्हणणे आहे की जनसुनावणी तहकूब करण्यात यावी.

तरी माझी विनंती आहे की या जनसुनावणी तहकूब करुन परत जनसुनावणी आयोजित करण्यात यावी, त्यात वनअधिकारी, महसूल अधिकारी, ज्यांच्या परवानग्या घ्याव्या लागतात ते सर्व अधिकारी यांना बोलवून परत जनसुनावणी ही घेण्यात यावी.

## २५) श्री वैजनाथ समीर कातकरी, जिल्हा-रायगडः-

एवढा मोठा प्रकल्प उभारणी करण्यात येणार आहे. तर त्यासाठी ज्या गाड्या म्हणजे ट्रक्स,डपर्स जाणार, ते आमच्या शेतातून, जमीनीतूनच जाणार आहेत. त्याबाबत कोणलेच नियोजन दिलेले नाही. येथील शेतकरी म्हणजे ते भालिवडी, आंबोटचे असतील, सर्व प्रकल्पाच्या गाड्या या आमच्या भूखंडातूनच जाणार आहेत. त्यासाठी स्थानिक जागा घेणार का याबाबत काहीही नियोजन नाही. याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.

तसेच या प्रकल्पासाठी ऊर्ध्व जलाशय (top reservoir) व निम्न जलाशय (bottom reservoir) बांधण्यात येणार आहे. आता सांगत आहेत की कोणालाही जागा सोडावी लागणार नाही. मात्र प्रकल्प विकसित झाल्यानंतर आम्हांला जागा सोडाव्या लागल्या तर आम्ही कुठे जायचे? शेतकरी बाधित झाल्यानंतर कंपनी शेतक-यांना काय दर देणार याबाबत माहिती द्यावी.

तरी आजची जनसुनावणी रद्द करुन पोटल किंवा पालीला जनसुनावणी आयोजित करण्यात यावी. म्हणजे आमचे स्थानिक नागरिक मोठ्या प्रमाणात येऊन आपले आक्षेप नोंदवतील.

**२६) अध्यक्ष, तंटामुक्ती, पोटल, तालुका-कर्जत,जिल्हा-रायगड:-**

येथे वनखात्याचे कोणी प्रतिनिधी बोलविले आहेत का? त्यांना का बोलाविल नाहीत?

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपली हरकत/आक्षेप पर्यावरण विभाग, भारत सरकारला कळविण्यात येईल.

त्यावेळी अध्यक्ष, तंटामुक्ती यांनी मत मांडले की शासन साप,डुक्कर मारु देत नाहित. तर प्रकल्पासाठी प्राण्याची वहिवाट बंद करणार, तर आम्ही कसे राहायचे?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपला आक्षेप शासनास कळविण्यात येईल.

**२७) श्री मनोज पाटील, राहणार-वडप,तालुका-कर्जत,जिल्हा-रायगड:-**

प्रकल्पासाठी २३३ हेक्टर ही वनक्षेत्रातील जागा अधिग्रहित करण्यात येणार आहे. येथील शेतक-यांच्या कित्येक वर्षांच्या अनुभवानुसार उन्हाळ्यात पाण्याचा साठी वरिल भागातील कमी झाल्यानंतर सर्व रानडुकरे ही खालच्या बाजूस पाणी व अन्न खाण्यास येतात. तसेच त्यांच्या शेतीचे, बागबगिचांचे नुकसानच होते. २३३ वनक्षेत्राचे रुपांतर/बदल केल्यानंतर वरच्या भागात जे वन्यजीव आहेत, त्यांचे पुनर्वसन कसे करण्यात येईल? तसेच जे वन्यजीव खालील भागात येतील ते खालच्या भागातील लोकांवर, येथील पाळीव प्राण्यांवर हल्ला केल्यास त्याबाबत आपले नियोजन,याचा संपूर्ण माहिती देण्यात यावी.

आमच्या गावातील सुमारे ४,०००-५,००० लोक वरिल ढाकाईच्या मंदिरात जर वर्षी जातात. प्रकल्प झाल्यास त्या मंदिराबाबतचे धोरण, पुनर्वसन व नियोजन.

तसेच अंडरग्राऊंड पॉवर प्रकल्प होणार आहे, तर तो विकसित करताना जे डबर, माती निघेल, त्याचे संकलन व विल्हेवाट कशी लावण्यात येईल?

**२८) श्री सुनील म्हसणे, राहणार-पोटल, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगडः-**

माझी पत्नी पोटल ग्रामपंचायतची सरपंच आहे. पोटल व पाली ग्रामपंचायतीतर्फे आपणास निवेदन दिलेले आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी लेखी निवेदन देण्याची सूचना केली. तसेच इतरही निवेदन सादर करावयाची असल्यास ती आठ दिवसात देण्याची सूचना केली.

**२९) लोकशाहिर गणेश ताम्हणे, राहणार-गौरकामत,तालुका-कर्जत,जिल्हा-रायगडः-**

काही वर्षांपूर्वी याच ग्रामपंचायतीच्या बाजूला तेरा एकरमधून रस्ता तयार करण्यास वनविभागाने परवानगी दिली नाही. आणि आता २३३ हेक्टर वनक्षेत्र वळती करण्याचा सरकारसमोर प्रस्ताव आहे. प्रकल्पाला कुठलाही विरोध नाही, प्रकल्प व्हावा, शेतक-यांना पैसे मिळावे, यास आमचा पुर्णपणे पाठिंबा आहे. मात्र सरकारचा दुजाभाव का आहे? जर १३ कि.मी. रस्ता वनखात्याने दिला असता, तर कर्जत तालुक्यात पर्यटन वाढले असते, आजूबाजूंच्या गावांचा विस्तार झाला असता. त्याला वनविभागाने परवानगी दिली नाही, आणि आज एवढ्या मोठ्या प्रकल्पाची जनसुनावणी आहे. मात्र हा सरकारचा दुजाभाव आहे. १३ एकर जागा कोठे व २३३ हेक्टर जागा कोठे? तरी शेतक-यांनी व सामान्य जनतेने याचा विचार करावा.

**३०) श्री निकेश पाटील, राहणार-उदकगाव, तालुका-कर्जत,जिल्हा-रायगडः-**

माझी सर्व शेतक-यांना विनंती आहे की प्रस्तावित कंपनीची माहिती देत आहेत. तर ती कमीतकमी ऐकून तरी घ्यावी. सादरीकरण पाहिल्याने प्रत्येक शेतक-याला प्रकल्प काय आहे ते कळेल.

**३१) श्री दिलीप श्रीखंडे, राष्ट्रवादी कर्जत तालुका अध्यक्ष, राहणार-पोटल, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगडः-**

मी सर्व शेतक-यांना विनंती करतो, हा प्रकल्प त्यांच्या म्हणजे कंपनीच्या फायद्यासाठी आलेले आहे, तुमच्या, आमच्या फायदयासाठी नाही. ढाक गावचा शेतकरी पाच वर्षांपूर्वीच जमीनी विकून मोकळा झालेला आहे. खाजगी व्यक्तीव्दारे जमिनी खरेदी करण्यात आल्या. आता कोणालाच माहित नाही, कोणाची जमीन जाणार आहे. येथील लोकप्रतिनिधींच्या

नातेवाईकांनाही माहित नाही कोठले भूखंड जाणार आहेत, तर सामान्य माणसाची काय स्थिती राहणार आहे?

जर वनक्षेत्राबाबत प्रकल्प आहे, तर वनअधिकारी येथे का उपस्थित नाहीत? तरी मी सर्व उपस्थितांना सांगत आहे की पक्षीय बाजू बाजूला ठेवा. हे सर्व त्यांच्या म्हणजे कंपनीच्या फायद्याचे चालले आहे, तुमच्या व माझ्या फायद्याचे नाही.

ज्या शेतक-याची एक एकर, दोन एकर जमिन आहे, तर त्यास शासनाच्या दराने मोबदला द्या, नंतर अधिग्रहण करा, तुमच्या प्रकल्पाचे स्वागत करण्यात येईल. सर्व पक्षाच्या लोकांची इच्छा आहे की स्थानिकांना गावातच रोजगार मिळावा.

येथील स्थानिक नागरिक म्हणून येथे उपस्थित आहेत. आम्हांलाच माहित नाही की कोणाची जमिन जाणार आहे. येथील स्थानिकांची इच्छा आहे की प्रकल्प बाधित प्रत्येक गावात ही जनसुनावणी घेण्यात यावी.

आमची ज्या शेतक-यांच्या जागा अधिग्रहित करणे आहे, त्यांच्या नावाच्या यादीसकट किती जागा अधिग्रहित करणार याची माहीती प्रसिध्द करण्यात यावी. आमचा प्रकल्पास विरोध नाही, स्थानिकांना रोजगार मिळावा हीच आमची भूमिका आहे.

तसेच आज विनंती आहे की ही जनसुनावणी येथे तहकूब करण्यात यावी व नंतर १५ दिवसांनी परत आयोजित करण्यात यावी.

**३२) श्री कुंडलिक मिसाळ, राहणार -ग्रुप ग्रामपंचायत, खांडी, तालुका-मावळ, जिल्हा-पुणे:-**

आमच्या गावात सोअरटेकचे काम चालू झालेले आहे, त्याबाबत ग्रामपंचायतींशी चर्चा केलेली नाही, तसेच ज्यांच्या जमिनी आहेत, त्यांना विश्वासातसुध्दा घेतलेले नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना आवश्यक असेल ती माहिती उपलब्ध करण्याची सूचना केली.

**३३) श्री अनंत नामदेव खंडागळे, राहणार-पाली, तालुका-पेण,जिल्हा-रायगड:-**

हा प्रकल्प २३३ हेक्टरमध्ये होत आहे, आणि उर्वरित जागा ही पाण्याखाली जाणार आहे. २३३ हेक्टरमध्ये आमच्या आदिवासी बांधवांची जागा दळीभाग येथे आहे. ते आदिवासी बांधव तेथे मेहनत करतात. त्यांनी झाडे लावलेली आहेत. त्यांची जागा जाणार याबाबत त्यांनी कोणीही माहिती दिलेली नाही.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग येथे येण्याची सूचना केली. त्याबाबत संबंधित दळीभाग अधिका-यांशी याबाबत चर्चा करण्याचे आश्वासन दिले.

**३४) श्री संदीप पाटील,राहणार-वडप,तालुका-कर्जत,जिल्हा-रायगड:-**

माहिती चांगली सांगितली, मात्र वडप, पोटल, पाली गावातील जे बाधित शेतकरी असतील, त्या सर्वांना या प्रकल्पाची माहिती देणे आवश्यक आहे. मी स्वतः बाधित शेतकरी आहे. पाईपगॅसलाईनीत माझी जागा गेलेली आहे. तरी बाधित शेतकरी, बाधित गावे यांना किती उत्पन्न मिळेल याची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रथम प्रकल्पाबाबतची माहिती ऐकण्याची तयार असावी. पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी झाली, म्हणजे प्रकल्पास मान्यता मिळते असे नाही. पर्यावरण अनुमती मिळाली नाही, तर प्रकल्प होणारच नाही.

**३५) श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, राज्य-तेलंगणा:-**

त्यांनी सांगितले की ते लेखी सूचना दोन दिवसात देतील. तरी दोन दिवसांनी लेखी सूचना सादर करण्याची परवानगी द्यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत घोषणा केली की ज्यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना,हरकती किंवा आक्षेप नोंदविण्याचे असेल, त्यांनी पुढील शुक्रवारपर्यत म्हणजे दिनांक १२ सप्टेंबर, २०२५ पर्यत कार्यालयीन वेळेत लेखीस्वरुपात सादर करु शकता.

लेखी सूचना/हरकती किंवा आक्षेप हे जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड,अलिबाग किंवा तहसीलदार, तहसील कार्यालय,कर्जत, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड किंवा उप प्रादेशिक कार्यालय,रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन,६वा मजला,सेक्टर-११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ येथे सादर करण्यात याव्यात. त्याची पोच देण्यात येईल. त्या सर्व सूचना/हरकती/आक्षेप बैठकीच्या इतिवृत्तासोबत केंद्र सरकारला सादर करण्यात येतील.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना उर्वरित सादरीकरण दर्शविण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी उर्वरित सादरीकरण पूर्ण केले.

### ३६) ॲड. संकेत भासे, राहणार-कर्जत,तालुका-कर्जत, जिल्हा-रायगडः-

सादरीकरण थांबवत ॲड. संकेत भासे यांनी सांगितले की आपण कितीही सांगितले तरी हे आम्हांला कळणार नाही. आम्ही शेतकरी आहोत. आमच्या प्रामुख्याने फक्त दोन-तीन मागण्या आहेत. पहिली मागणी कुठल्या जमिनी अधिग्रहित करणार त्यांचे सर्व गट नंबर/सर्व्हे नंबर व भूखंडधारक/शेतकरी यांची यादी प्रसिध्द करावी. त्यांना योग्य मोबदला देण्यात यावा, जेणेकरुन तो सुखावेल.

दुसरी मागणी पर्यावरणाबाबत. केंद्र सरकारची पूर्व परवानगी ही घ्यावी लागेल. तिसरी गोष्ट येथे उपस्थित असलेल्या प्रत्येक शेतक-यास हा प्रकल्प पाहिजे म्हणजे पाहिजेच. ही आमची मागणी आहे. कारण प्रस्तावित प्रकल्पामुळे कर्जत तालुक्याचा भविष्यात होणारा विकास ही महत्वाचा मुद्दा आहे. स्थानीक शेतक-यांचे कुठेही नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. प्रकल्प प्रवर्तकांना आम्ही सहकार्य करण्यास तयार आहोत.

पर्यावरणाबाबत सूचना करताना आमचे जे ढाकाईचे मंदिराचे संवर्धन, तसेच येथे शिवाजी महाराजांच्या काळतील एक किल्ला आहे, त्याचे संरक्षण,संवर्धन कसे करता येईल, जंगल/झाडे तोडल्यानंतर त्यांचे पुनर्वसन या बाबींवर उत्तरे मिळणे अपेक्षित आहे. प्रकल्प लादण्यात येऊ नये, पण प्रकल्पाबाबत पूर्वकल्पना द्यावी, तसेच जे प्रकल्पबाधित आहेत त्यात शेतकरी व इतर स्थानिक असतील, त्यांना प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात यावी.

तरी सर्व ग्रामपंचायतीतर्फे या प्रकल्पास पाठिंबा देण्यात येत आहे. परत एक जनसुनावणी आयोजित करुन फारसे काहीही अतिरिक्त साध्य होणार नाही.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की ही जनसुनावणी म्हणजे प्रकल्पास परवानगी नाही हे सर्वांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. दुसरी बाब प्रकल्प प्रवर्तकांनी जो प्रस्ताव केंद्र सरकारला सादर केला, त्यानुसार केंद्र सरकारने प्रस्तावित प्रकल्पाविषयी स्थानिकांचे मत,सूचना घेण्याचे निर्देश दिले. लोकांनी उपस्थित केलेले मुद्यांचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करुन ते इतिवृत लेखी सूचना,आक्षेप यांसह पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेते. जर केंद्र सरकारने परवानगी दिली नाही, तर प्रकल्प होतच नाही. आणि जर परवानगी दिली की नंतर पुढीलल कार्यवाही म्हणचे भूसंपादन, मोबदला या बाबींची विचारपूर्वक अंमलबजावणी करण्यात येते.

आता हा खाजगी प्रकल्प आहे. समजा त्यांनी जमिन विकत घेतली असेल व परवानगी मिळाली नाही, तर जमिनीचे काय करावे, त्यास शासन जबाबदार नाही. मात्र शासनास २०१३

च्या कायद्यानुसार भूसंपादन करण्याचे आदेश दिल्यास त्यानुसारच मोबदला द्यावाच लागेल हे न चुकणा-या गोष्टी आहेत. आपण उपस्थित केलेल्या मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

त्यावेळी ॲड. संकेत भासे यांनी माहिती दिली की कर्जत तालुक्यात वेगवेगळ्या प्रकल्पासाठी अधिग्रहण चालू आहे. रेल्वेने मोठ्या प्रमाणात जमिनी अधिग्रहण केलेल्या आहेत, टाटाने अधिग्रहण केले, आता टोरोंटो कंपनी करणार आहे. त्यामुळे अशा प्रकल्पाचे आम्ही स्वागतच करतो. आमची एकच मागणी आहे की स्थानिक शेतक-यांना, स्थानिकांना विश्वासात घेऊनच प्रकल्प उभारणी व्हावी. येथील सर्व लोकप्रतिनिधी यांना विश्वासात घेण्यात यावे.

**३७) श्री तुकाराम खोल्लम, ग्रामपंचायत खांड कसूर, वडगाव मावळ, जिल्हा-पुणे:-**

आपण म्हणत आहात, काम चालू नाही, मात्र कसूर गावात माती परिक्षण (soil testing) काम चालू आहे. तर ते कसे चालू आहे?

ही रायगड जिल्ह्यातील जनसुनावणी आहे. पुणे जिल्ह्यातील जनसुनावणी ही जिल्हाधिकारी, पुणे हे घेतील. रायगड जिल्ह्यातील काही असल्यास त्याबाबत निवेदन देण्यात यावे.

**३८) श्री योगेश विजय महामुनी, राहणार-मुंबई, नेचर केअर्स सोल्युशन:-**

प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (ईआयए) हा भारत सरकारला सादर केलेला आहे का, असल्यास तो मागच्या किती महिन्यांचा अहवाल सादर केलेला आहे?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (ईआयए) हा भारत सरकारला, महाराष्ट्र सरकारला सादर करण्यात आलेला आहे.

प्रस्तावित प्रकल्पाबाबतचे पर्यावरणी सर्वेक्षण हे भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजुरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्त करून पर्यावरण सल्लागार यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण तीन्ही क्रतूंमध्ये म्हणजे पावसाळ्यापूर्व कालावधी – मार्च, २०२५ ते मे, २०२५, पावसाळ्यानंतरच कालावधी – ऑक्टोबर, २०२४ ते डिसेंबर, २०२४ आणि हिवाळी कालावधी – डिसेंबर, २०२३ ते फेब्रुवारी, २०२४ या कालावधीत पूर्ण करण्यात आलेले आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या आदेशानुसार प्रकल्पाचे उर्वरित सादरीकरण पूर्ण केले.

**३९) श्री कैलास पोटे, राहणार-वडप,तालुका-कर्जत,जिल्हा-रायगडः-**

वडप व गौरकामत ग्रामपंचायत हद्दीमधील बरेच ग्रामस्थ आपल्या उदरनिर्वाहासाठी जंगलातून करवंदे, जाभंळे, रानभाज्या, कोकम, मध अशा वस्तु गोळा करुन विकत असतात. परंतु नव्याने होत असलेल्या साईडोंगर जलविद्युत प्रकल्पामुळे त्यांच्या उदरनिर्वाहचे साधन संपुष्टात येणार आहे. त्यासाठी शासनाकडून उपाययोजना करण्यात याव्या, ही विनंती.

दुसरा मुद्दा- ढाक गावात जाण्यायेण्याची सोय नसल्याने अनेक लोक ढाक गावातील पायथ्याजवळ राहण्यास आले. काहींची घरे पडलेली आहेत. काहींच्या जमीनी अगदी मातीमोल भावाने विकल्या गेल्या. तरी ज्यांची घरे पडली, त्यांना प्रकल्पग्रस्त घोषित करुन त्यांना प्रस्तावित साईडोंगर जलविद्युत प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात यावी, ही विनंती.

**४०) श्री हरेश देशमुख, राहणार-पोटल पाली, तालुका-कर्जत,जिल्हा-रायगडः-**

तुम्ही जो साईडोंगरचा उल्लेख करत आहात, ते प्रत्यक्षात पालीच आहे. साईडोंगर परिसरात कुठलीच वस्ती नाही. प्रकल्प प्रवर्तकांना सांगणे आहे की त्यांनी जे सादरीकरण केले, ते प्रथम पाली येथे करणे योग्य होते. या प्रकल्पाचे पाली हे सर्वात मुख्य बाधित गाव आहे. पाली गावातील बरेच लोक आलेले आहेत, पण त्यांना बोलायची संधी मिळालीच नाही.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की जरी येथे बोलण्याची संधी मिळाली नसली तरी ते पुढील शुक्रवारपर्यत म्हणजे दिनांक १२ सप्टेंबर, २०२५ पर्यत कार्यालयीन वेळेत लेखी सूचना/हरकती किंवा आक्षेप हे जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड,अलिबाग किंवा तहसीलदार, तहसील कार्यालय,कर्जत, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड किंवा उप प्रादेशिक कार्यालय,रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन,६वा मजला,सेक्टर-११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ येथे सादर करु शकतात. त्याची पोच देण्यात येईल. त्या सर्व सूचना/हरकती/आक्षेप बैठकीच्या इतिवृतासोबत केंद्र सरकारला सादर करण्यात येतील.

श्री हरेश देशमुख यांनी मागणी केली की प्रकल्प प्रवर्तकांनी पुढील आठ दिवसाच्या आत फक्त पाली गावात येऊन बैठक आयोजित करुन संपूर्ण मराठी सादरीकरण पाली ग्रामस्थांसमोर द्यावे. बैठकीत प्रकल्पाचे सर्व अधिकारी उपस्थित असावेत. सर्व ग्रामस्थांना प्रकल्पाविषयी संपूर्ण माहिती सांगावी. त्यामुळे आम्हांला आमच्या सूचना, हरकती योग्यप्रकारे मांडता येतील.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी परत अगोदर सांगितल्याप्रमाणे पुढील आठ दिवसात लेखी सूचना, हरकती नोंदविण्याची सूचना केली.

**४१) श्री निखिल गवई, राहणार-साईडोंगर शेतकरी-**

मी ग्रामस्थ नसलो तरी शेतकरी आहे. बैठकीत उल्लेख करण्यात आल्यानुसार प्रकल्प स्थापनेमुळे पाण्याची पातळी ही कमी होणार आहे. त्यामुळे तेथे होणारे पीक हे कमी होणार आहे. याचा उल्लेख सादरीकरणात केलेला नाही. तसेच प्रकल्प स्थापनेनंतर किती कालावधीत तेथील पर्यावरण, पाण्याची पातळी ही पूर्ववत होईल याचा उल्लेख असणे गरजेचे आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की भारत सरकारच्या निर्देशांप्रमाणे पर्यावरण सर्वेक्षण करताना प्रस्तावित प्रकल्पाचा संभाव्य परिणामाचा अभ्यास करण्यात आलेला होता. उलट जलाशय बांधल्यामुळे तेथील व जवळपासची भूजलाची पातळी ही वाढणार आहे. शिवाय पाण्यामध्ये घळभरणी होणार आहे, ती एका जलवर्षात करत नसून २-३ वर्षात घळभरणी करणार आहोत.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी परत उपस्थितांना आवाहन केली की ज्यांना लेखी निवेदन सादर करायचे आहेत, ते त्यांनी येथे सादर करावीत.

**४२) दिपाली मेढेकर:-**

प्रकल्प विकसित करताना जो मलबा निघणार आहे, तर त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येणार आहे?

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की एकशेदहा लाख घनमीटर मलबा निघणार आहे. मात्र ५०% पेक्षा जास्त मलबाचा बांधकामातच पुनर्वापर होणार आहे. उर्वरित मलबा विल्हेवाट क्षेत्र तयार करुन तेथे शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येईल.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत परत आवाहन केले की ज्यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, हरकती किंवा आक्षेप नोंदविण्याचे असेल, त्यांनी पुढील शुक्रवारपर्यत म्हणजे दिनांक १२ सप्टेंबर, २०२५ पर्यत कार्यालयीन वेळेत लेखी सूचना/हरकती किंवा आक्षेप हे जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग किंवा तहसीलदार, तहसील कार्यालय, कर्जत, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड किंवा उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६वा मजला, सेक्टर-११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ येथे सादर करु शकता. बैठकीच्या इतिवृत्तासोबत त्या भारत सरकारला सादर करण्यात येतील.

समारोपावेळी, मा. अध्यक्षांनी सर्वांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

प्राप्त झालेले एकूण ६४ पाठिंबा/सूचना याबाबत आणि १७ आक्षेप याबाबत पत्रे सोबत जोडलेली आहेत. तसेच, प्रकल्प प्रवर्तक यांनी जाहीर जनसुनावणीत (विस्तारिकरण) विचारण्यात आलेल्या प्रश्नांना अनुसरून त्यांचा खुलासा व प्रस्तावित प्रकल्पाबाबत संक्षिप्त माहिती ही म. प्र. नि. मंडळास सादर केलेली असून त्याची प्रत या इतिवृत्तासोबत संलग्न करण्यात आलेली आहे.

**(ऋतुजा भालेराव )**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
रायगड-२,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड,
रायगड भवन, नवी मुंबई

**(संजय भोसले)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड,
नवी मुंबई

**(संदेश शिर्के)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग,
जिल्हा – रायगड